महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

संचालनालय,लेखा व कोषागारे,
मुंबई पोर्ट ट्रस्ट,बॅलार्ड इस्टेट,
शुरजी वल्लभदास मार्ग,
ठाकरसी हाऊस, 3 रा माळा,
विदेश टपाल कार्यालयाजवळ
फोर्ट,मुंबई-400 001.

माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.022-22622035 ,022-22262036
संकेतस्थळ:- www.mahakosh.in

E.Mail ID - ad.admin@mahakosh.in
jd.kosh@mahakosh.in

संदर्भ :- १. शासन निर्णय वित्त विभाग क्र.११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३,दि.२०.०७.२००१.
२. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३,दि.११.०१.२००२.
३. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४३/सेवा-३,दि.३१.०८.२००९
४. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/९९/सेवा-३,दि.०१.०४.२०१०.
५. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०१.०७.२०११.
६. शासन निर्णय वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३,दि.१९.०१.२०१३.
७. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपुर -१२१२/प्र.क्र.३१/सेवा-९,दि.११.०२.२०१३.
८. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन -११११/प्र.क्र.०८/सेवा-३,दि.१९.१२.२०१६
९. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.आप्रयो -१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३,दि.२३.१२.२०१५
१०.शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन -११११/प्र.क्र.०८/सेवा-३,दि.११.०५.२०१७

## आदेश

क्र.संलेको/०८.२०१७/का-१/प्रशा राप/आप्रयो/पहिला/दुसरा लाभ/ ६८७

दि. 01 AUG 2018

**विषय**:-म.वि.ले.सेवेतील गट-ब,लेखाधिकारी (रा.प.) संवर्गातील अधिका-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर करणे करणे बाबत.

उपरोक्त संदर्भ क्र.१ वरील शासन वित्त विभागाच्या दि.२०.०७.२००१ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय अधिका-यांना संबंधित पदावरील १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर लागू करण्यात आलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सुधारित स्वरुपात उपरोक्त संदर्भ क्र.४ वरील दि.०१.०४.२०१० च्या शासन निर्णयान्वये दि.०१.१०.२००६ पासून अंमलात आली आहे.

सदर योजनेअंतर्गत कमाल वेतन बँड पी.बी.-३ (रु.१५६००-३९१००) ग्रेड पे ५४०० पर्यंत वेतन घेणा-या अधिका-यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येईल.

यास्तव संदर्भ क्र.२ वर नमूद दि.११.०१.२००२ च्या शासन निर्णयान्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन संचालक,लेखा व कोषागारे,महाराष्ट्र राज्य,मुंबई हे महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) संवर्गातील वेतन बँड

रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४६०० या सुधारित वेतनसंरचनेतील खालील नमूद अधिका-यांना त्यांच्या १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नतीच्या साखळीतील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील वेतन बँड रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु.५४०० या सुधारित वेतनसंरचनेत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर करीत आहेत.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचेनाव/पदनाम/ कार्यालय | म.वि.व ले.से.गट-ब पदावरील सलग पद स्थापनेचा / पहिला लाभ मंजूर दिनांक | सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला /दुसरा लाभाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री.प्रदिप नामदेव शिरधनकर,<br>लेखाधिकारी<br>से.नि.दि.०१.०६.२०१८<br>वैद्यकीय प्रशासन अधिकारी राज्य राज्य कामगार विमा योजना,<br>वरळी, मुंबई | पहिला लाभ-लेखाधिकारी<br>०५.०१.२००२<br>पदोन्नती लेखाधिकारी<br>०१.०६.२००९ | देय दुसरा लाभ – सहा.संचालक<br>०४.०१.२०१४ |
| २ | श्री.अरुण भिका पाटील,<br>लेखाधिकारी,<br>से.नि.दि.३१.०८.२०१३<br>मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,आरे दुग्ध वसाहत,<br>गोरेगांव (पुर्व) मुंबई -४०० ०६५ | पहिला लाभ-लेखाधिकारी<br>३०.०६.१९९६<br>पदोन्नती लेखाधिकारी<br>२९.०६.१९९७ | देय दुसरा लाभ – सहा.संचालक<br>३०.०६..२००८ |
| ३ | श्री.नारायण महादेवराव बोडखेकर<br>लेखाधिकारी ,<br>कार्यकारी संचालक,<br>विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ<br>नागपुर ,सिंचन सेवा भवन, सिव्हिल लाईन्स,नागपुर-४४० ००१ | पहिला लाभ-लेखाधिकारी<br>२४.११.२००५<br>पदोन्नती लेखाधिकारी<br>०८.०९.२००९ | देय दुसरा लाभ – सहा.संचालक<br>२४.११.२०१७ |

१. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यावर वेतननिश्चिती नियमित पदोन्नती प्रमाणे होईल. मात्र त्याच वेतनश्रेणीत नियमित/कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ देय होणार नाही.

२. शासन,वित्त विभाग,शासन निर्णय दि.23.12.2015 अन्वये या योजनेखाली पहिला/दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या अधिकाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील,मात्र दिलेल्या लाभाची वसूली करण्यात येणार नाही.

३. वरील कर्मचा-यांनी शासन निर्णय वित्त् विभाग क्र.पीएवाय-1082/सीआर 1100 (एक)/एसईआर-3, दिनांक 06.11.1984 अन्वये वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती करिता हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत विकल्प द्यावा.

४. संबंधित कार्यालय प्रमुखांनी वरील कर्मचा-यांची पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करुन त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक व ग्रेड वेतनानुसार द्यावा.

५. सदरचे आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने संबंधित अधिका-यांच्या वेतननिश्चितीसाठी कार्यालयप्रमुख यांनी संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरावी.

( ज.र.मेनन)
संचालक,लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्यमुंबई,

प्रत:- सविनय सादर :-प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) महाराष्ट्र शासन,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
प्रत सस्नेह अग्रेषित :-

१. महालेखापाल, महाराष्ट्र -१,मुंबई.
२. संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
३. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,ठाणे
४. सहसंचालक,स्थानिक निधी लेखापरिक्षा,(म.न.पा.ले.अ.) कोकण भवन,बेलापुर
५. सर्व संबंधित कार्यालय,प्रमुख
६. संबंधित अधिकारी यांची वैयक्तिक धारिकानिवड नस्ती प्रशासन राजपत्रित शाखा.